# येशूचे आमच्या थोर राजाचे आज्ञापालन करणे

## आम्ही विश्वासणारे येशूच्या आज्ञा पाळतो कारण आम्ही त्याच्यावर प्रेम करतो

मुलांना शिकवणाऱ्यांनी **F3b** हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू येशू तू आमच्यासाठी मरण पावलास, मरणातून पुन्हा उठलास आणि गौरवात वर गेलास माझी मंडळी आणि मी तुझ्यावर प्रेम करतो तुझ्या आज्ञांचे पालन करून प्रेमाने तुझी सेवा करण्यास आम्हांला शिकव."

### 1. आज्ञापालन शिकवण्यासाठी प्रार्थना व देवाचे वचन यातून स्वतःची तयारी करा.

आज्ञापालन केल्याने तुमची मंडळी मजबूत होते आणि छळ, दुःख व नकार ह्या गोष्टींचा सामना करण्यास साहाय्य होते हे स्तेफनाच्या कथावृत्तांतावरून शिका. स्तेफन हा रक्तसाक्षी होणारा पहिला विश्वासणारा होय. येशूने काय केले याची साक्ष तो त्याच्या आज्ञेप्रमाणे देत असे (प्रे. कृ. 1:8).



**पाहा प्रे. कृ. 7:54-8:8 मध्ये**

- देवाच्या आशीर्वादाने स्तेफन परिपूर्ण झाला.
- त्याला काय पहायला मिळाले.
- त्याने कशा विषयी साक्ष दिली.
- त्याने काय प्रर्थना केली.
- विश्वासणारे जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी काय केले.

**पाहा योहान 14:15-21... मध्ये**

- विश्वासणाऱ्यांनी ख्रिस्ता बद्दल त्यांना वाटणारे प्रेम कसे दाखवावे.
- येशूच्या आज्ञा पाळणाऱ्यांना होणारे फायदे.

**पाहा इब्री 5:8-9... मध्ये**

- येशु स्वतः आज्ञापलन करण्यास कसे शिकला.
- येशुच्या आज्ञा पाळणाऱ्यांना होणारे फायदे.

**पाहा1 योहान 2:3-4... मध्ये**

- आमची ख्रिस्ताशी ओळख झाली आहे याची खात्री आम्हांला कशी पटते.
- येशुच्या आज्ञा पाळणाऱ्यांना होणारे कायदे.

**पाहा 1पेत्र 1:2... मध्ये**

- देवाने आम्हांला त्याचे लोक म्हणून निवडले आहे याची खात्री आम्हाला कशी पटते.
- येशूच्या आज्ञा पळणाऱ्यांना होणारे कायदे.

**पाहा प्रे.कृ.5:27-32 मध्ये**

- विरोधी प्रतिकूल अधिकाऱ्यांना सत्यपूर्वक उत्तर देण्याचे धैर्य आम्हांला कसे मिळते.
- येशूच्या आज्ञा पाळणाऱ्यांना होणारे फायदे.

**पाहा मत्तय 28:16-20 मध्ये**

- येशूने शेवटची आज्ञा कोणत्या अधिकाराने दिली.
- इतरांना येशूचे शिष्य होण्यास मदत करण्यास येशूने आम्हांला कशी आज्ञा केली.
- इतरांना येशूच्या आज्ञा पाळण्यास साहाय्य करणाऱ्यांना मिळणारे फायदे.



**पाहा 1 पेत्र 1:13-22 मध्ये**

- आज्ञा पालन करणारे ख्रिस्ती लोक या जगात आपले जीवन कसे जगतात.
- येशूच्या आज्ञा पाळणाऱ्यांना होणारे फायदे.

**पाहा प्रकटी 14:12-13 मध्ये**

- ख्रिस्ती लोकांना अखेरपर्यन्त येशूशी विश्वासू कसे राहता येते.
- येशूच्या आज्ञा पाळणाऱ्यांना होणारे फायदे.

पुढे वचनांची यादी दिली आहे, तर दुसऱ्या बाजूला येशूने यरूशलेमेमधील नव्या विश्वासणाऱ्यांना तत्काळ आचरणात आणण्यासाठी काही आज्ञा दिल्या आहेत (प्रे. कृ. 2:37-47 वचने आणि त्या संबंधीची कृती यांच्या योग्य जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| **लूक 22:19-20** | **आपुलकीची सहभागिता** |
| **योहान 13:34** | **भाकर मोडणे** |
| **लूक 6:38** | **बाप्तिस्मा करणे** |
| **मत्तय 28:19-20** | **येशूच्या नावात प्रार्थना करणे** |
| **योहान 16:24** | **उदारपणे दान देणे** |

**2. आठवडयामध्ये करावयाच्या कार्यक्रमांचे सहकाऱ्यांच्या साहाय्याने नियोजन करा.**

सध्याच्या गरजांनुसार कार्यक्रम निवडा. कदाचित् तुम्हांला पुढील गोष्टी करता येतील

- संकटात असणाऱ्या किंवा तुरूंगात असलेल्या विश्वासणाऱ्यांची जाऊन भेट घ्या आणि भाग 1 मधील पवित्र शास्त्रातील वचनांमधून त्यांना प्रोत्साहन द्या.
- तुम्हांला त्रास देणाऱ्यांचे नाव घेऊन त्यांच्यासाठी प्रार्थना करा. देवाने त्यांना आशीर्वाद देऊन स्वत:ची ओळख करून द्यावी अशी विनंती करा.
- विश्वासणाऱ्यांनी छळाला कसा प्रतिसाद दिला आणि येशूशी प्रामाणिक राहण्यास तुम्हांला त्यांना कसे शिकवता येईल याविषयी चर्चा करा. एकत्र येऊन वेळ व्यतीत करा. प्रभूची उपसना करा आणि विश्वासू राहण्यासाठी सामर्थ्य देण्याची विनंती करा.

**3. आगामी उपासना सभेचे सहकाऱ्यां बरोबर नियोजन करा**

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रम निवडा.

प्रे कृ. 7:51-8:8 मधून स्तेफन रक्तसाक्षी झाला त्याचा वृत्तांत सांगा किंवा नाट्य रूपाने दाखवा.

भाग 1 मध्ये दिलेल्या पवित्र शास्त्रातील वचनांची विश्वासणाऱ्यां बरोबर उजळणी करा. त्यांना आढळलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारा त्यांना बोलण्यास उत्तेजन द्या. त्यांनी प्रश्नाचे उत्तर चुकीचे दिले असल्यास त्यांना बरोबर उत्तर काय आहे ते सांगा.

येशूच्या आज्ञा पाळल्याने गेल्या महिन्यात देवाने कशा प्रकारे आशीर्वाद दिला याविषयी साक्ष वा अहवाल देण्यास विश्वासणाऱ्यांना सांगा.

मुलांना त्यांनी तयार केलेली नाटिका सादर करण्यास तसेच वाचन वाचण्यास सांगा.

प्रभुभोजनाचे वाटप करण्यापूर्वी प्रकटी 19:5-10 ह्या वचनांमधून कोकऱ्याच्या लग्नाच्या मेजवानीचा वृत्तांत वाचा. येशूचे पृथ्वीवर परत येणे आणि त्याच्यासंगती भव्य मेजवानीमध्ये आमचा सहभाग हया गोष्टींकडे लक्ष लावण्यास प्रभुभोजन साहाय्य करते हे स्पष्ट करा.



उपासकांचे लहान लहान गट तयार करा आणि एकमेकांच्या गरजा, काळज्या ऐकून घ्या एकमेकांना प्रोत्साहनपर चार शब्द सांगा तसेच येशूच्या आज्ञा पाळता याव्यात याकरीता एकमेकांसाठी प्रार्थना करा. तसेच विश्वासणाऱ्यांचे शत्रू व छळ करणारे यांच्यासाठी प्रार्थना करा.

**पाठ करा.** रोम 6:17-18

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net